
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# व्यवस्थेच्या अनास्थेमुळे होणारी निवडणूक कर्मचाऱ्यांची अवहेलना

डॉ. तुषार निकाळजे



**प्रस्तावना :**

रात्रीचे २ वाजून ६ मिनिटे झाली होती. एक २६-२७ वर्षांची महिला निवडणूक अधिकारी मंडपातल्या माईकवर बोलत होती. तिच्या डाव्या हातात कपाळावरील घाम पुसणारा रूमाल व उजव्या हातात वडापाव होता. ''लोकशाहीच्या महामहोत्सवात आपल्या निवडणूक कर्मचाऱ्यांनी जे योगदान दिले त्याबद्दल निवडणूक आयोग आपला आभारी आहे.'' त्यावेळी मंडपामध्ये निवडणूकीचे काम करणाऱ्या ६ महिला व ३ पुरूष बसले होते. हे चित्र रात्री दोन वाजताचे होते. तत्पूर्वी सायंकाळी ८ वाजता अंदाजे १५०० कर्मचारी वेगवेगळ्या २५० मतदान केंद्रांवरून इव्हीएम मशिन, बॅलेट बॉक्स, वेगवेगळी संविधानिक - असंविधानिक पाकीटे, वोटींग कंम्पार्टमेंट, एक पोते, इत्यादि साहित्य घेऊन उपस्थित झाले होते. हे दृश्य नुकत्याच झालेल्या मतदानाच्या दिवशी सायंकाळी ८ ते रात्री २ वाजून १२ मिनिटांपर्यंत होते. त्याच दिवशी सकाळी पाच ते पावणे सहा वेळेत कर्मचाऱ्यांच्या अंघोळी, दंत मंजन यांचा कार्यक्रम उरकून सकाळी ५-४५ ते ६-४५ मॉकपोल, सकाळी ७ ते सायंकाळी ६ मतदान प्रकिया, सायंकाळी ६ ते ७-३० वाजेपर्यंत पाकिटे भरणे, मतदान यंत्रे सिल करणे व बस मधून मतदान साहित्य जमा करण्याकरिता रवाना होणे या प्रक्रिया पूर्ण कराव्या लागल्या होत्या. आदल्या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून मतदान केंद्रावर उपस्थिती अनिवार्य होती.

पण हे सगळे घडत असताना मनाला कुठेतरी यातना होत होत्या. कोल्हापूर येथील श्री. चंदनशिवे या निवडणूकीचे काम करण्यासाठी जाणाऱ्या कर्मचाऱ्याचा सकाळी अपघात झाला व तो जागीच ठार झाला. त्याची मोटरसायकल दुसऱ्या एका दुचाकीला धडकली. ती दुसरी दुचाकी निवडणूकीचे काम करणाऱ्या दोन महिला कर्मचाऱ्यांची होती. दुसरी घटना सीआरपीएफ च्या जवानांना १२ तास उपाशी राहावे लागले. दोन दिवसांत ते फक्त पाच तास रस्त्याच्या कडेला झोपले. तिसरी घटना मध्यप्रदेशात (गुणा, भोपाळ) मतदानाच्या वेळी मतदान केंद्रावर एका केंद्राध्यक्षाचा हृदयविकाराने मृत्यू झाला व इंदोर येथील दोघांचा नोव्हेंबर २०१८ मध्ये मृत्यू झाला होता. चौथी घटना श्रीनगर (झलंगम गाव) येथे मतदानाच्या कामासाठी जात असलेल्या बसवर जमावाने केलेल्या दगडफेकीमुळे चालकाचा बसवरील ताबा सुटून दुर्घटना घडली त्यामध्ये एक पोलीस मृत्यूमुखी पडला व इतर १५ कर्मचारी गंभीर जखमी झाले. या सर्व घटना निवडणूका व मतदानाच्या प्रक्रियेच्या दिवशी घडल्या होत्या. या सर्व घटनांचा, निवडणूक प्रक्रिया, नियम, कर्मचाऱ्यांच्या नेमणूका, कर्मचाऱ्यांची शारिरीक, मानसिक, प्रशासकीय प्रश्न यांची चर्चा या लेखामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

- सायंकाळी ८-४५ वाजता मतदान साहित्य जमा केल्यानंतर त्याची ना-हरकत मिळणेसाठी जर रात्रौ २ वाजून १२ मिनिटांपर्यंत विना अन्न-पाणी (स्वतःकडील भेळ, बिस्कीटे, फरसाण, केक) शिवाय शासकीय मंडपात बसून राहण्याची वेळ येते.
- नियुक्ती अधिकारी व निवडणूक आयोग यांच्यातील समन्वयाचा अभाव जाणवतो.

- समान काम समान वेतन – प्रत्येक केंद्रावर मतदारांची संख्या भिन्न जाणवते. काही मतदान केंद्रावर ९९५, १०८४, १३००, १००४, ८३६, ८७५, ११७८, ८६७ अशी विभागलेली असते. वर्ष २०१४ मध्ये झालेल्या निवडणूकीत ८५० ते ९५० मतदार विभागण्याचा प्रयत्न झाला होता. सध्या शासकीय सेवकांची कमतरता आहे. सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांऐवजी नवीन नेमणूका किंवा नवी भरती झालेली नाही. फक्त ५० ते ६०% कर्मचाऱ्यांवरच व्यवस्थेचे काम चालू आहे. याच सेवकांना मतदार याद्या अद्ययावत करणे, जनगणना (आर्थिक, जातीनिहाय, डोईनिहाय) काम करावे लागते. मूळ नियुक्ती कार्यालयातील काम देखील स्वतःच पूर्ण करावे लागते.
- विविधतेतील एकता – महाराष्ट्रासारख्या राज्यामध्ये इतर राज्यांमधून बदली झालेले केंद्र शासनाचे काही सेवक व अधिकारी आहेत. उदा. पंजाब, उत्तरप्रदेश, केरळ, कर्नाटक इत्यादि. त्यांना या निवडणूकीचे काम दिले जाते. यातील कांहीना मराठी भाषा अवगत नसते. तरीही ते राष्ट्रीय कर्तव्य म्हणून ते काम करतात. अशावेळी ते भाषावाद किंवा प्रांतवाद पूर्णपणे विसरतात. शास्त्रज्ञांना देखील निवडणूकीचे काम दिल्याची उदाहरणे आहेत. त्यांनी कोणतीही तक्रार केलेली नाही.
- निवडणूकीचे काम कोणी करावे – अंगणवाडी सेवकांना निवडणूक आयोगाने कामातून वगळले आहे. तसेच माध्यमिक शाळांमधील शिक्षक व कर्मचारी यांना देखील सुट दिली आहे. हा सर्व बोजा नागरी सेवकांवरच पडतो.
- बंद शाळांचे रूपांतर मतदान केंद्रात – ग्रामपंचायत व महानगरपालिकांमध्ये वर्ष १९६० ते १९७० दरम्यान बांधलेल्या काही शाळा आता वापरात नाहीत. अशा शाळांमध्ये मतदान केंद्रे स्थापित केली जातात. इ. ५ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांकरता असणारी बाकडे निवडणूक कर्मचाऱ्यांना १४ तास काम करण्यासाठी वापरले जातात. विद्यार्थ्यांची व कर्मचाऱ्यांची शारिरीक रचना पाहता हे किती योग्य आहे? या बंद शाळा स्वच्छ करण्यासाठी स्वतःच्या खर्चाने झाडू विकत आणावा लागतो. एखाद्या वर्गातील अर्धे घमेले कचरा काढून स्वच्छता करावी लागते. रात्री मच्छरांनी घेतलेल्या चाव्यांमुळे झोप येवू शकते का?
- लोकशाही, सुशासन, निवडणूका यांच्या कार्यशाळा कशासाठी? – शासन वेगवेगळ्या समाजातील घटकांची कार्यशाळा घेत असते. या कार्यशाळेत ४२ प्राध्यापक व एखादा शासकीय कर्मचारी यांची नेमणूक करतात. परंतु कार्यशाळेस फक्त ९ प्राध्यापक व तो एखादा कर्मचारी उपस्थित असतो. या कर्मचाऱ्यांना कार्यशाळेमध्ये कर्मचाऱ्यांसंदर्भात मांडलेल्या प्रश्नांवर व समस्यांना नंतर कचऱ्याची टोपली दाखवली जाते.
- आयुक्तांच्या कालावधीचे गौडबंगाल – आजपर्यंत २३ मुख्य निवडणूक आयुक्त नेमले गेलेले आहेत. या आयुक्तांमधील १३ आयुक्त हे फक्त २ वर्ष ५ महिने या अल्प कालावधीमध्ये नेमले गेले. यातील एकालाही कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत गांभिर्य नसावे का?
- कर्मचाऱ्यांचे वेतन – कर्मचाऱ्यांना रूपये १३०० मानधन दिले जाते. या १३०० रूपयांमध्ये स्वतःच्या दोन वेळचा जेवणाचा खर्च, एक नास्ता, ६ पाण्याच्या बाटल्या, २ वेळचा चहा, प्रशिक्षणा दरम्यान जाणे-येणेचा खर्च भागवावा लागतो. हेच सेवक प्रशासकीय खर्चामध्ये ९५० कोटी रूपये बचत करत असतात. यांना जर सुविधा पुरविल्यास फक्त ८० कोटी खर्च होऊ शकतो. परंतु .........?
- कर्मचाऱ्यांच्या समस्यांवरील संशोधनाला अटकाव – विद्यापीठ अनुदान आयोगाकडे वर्ष २०१६ पासून कर्मचाऱ्यांच्या समस्यांवरील संशोधनांचे प्रकल्प / प्रस्ताव प्रलंबित आहेत. तर काही संशोधन संस्थांनी असे अभ्यासक्रम उपलब्ध नाहीत व दुसऱ्या बाजूने शासनाकडून २ ते ३ कोटी रूपये अनुदान मिळविल्याची उदाहरणे आहेत.

सुरूवातीस पहिल्या परिच्छेदात ज्या घटना घडल्या त्यांचा वरील प्रक्रियेशी काही संबंध असेल का? याचा विचार व्हावा. अन्यथा एका शहरातील घटनेचा येथे आवर्जुन उल्लेख करावा वाटतो. घटना – नगरपालिकेच्या बस ड्रायव्हरने बेदरकारपणे बस चालवून काही निरपराध ठार झाले व बरेच जखमी झाल्याचे उदाहरण आहे. या घटनेनंतर प्रशासन, व्यवस्था, कामाचे तास, सोयी सवलती, सुट्टया, वेतन, नियम, त्याचे मानसिक आरोग्य यांचे उत्खनन झाले. जर एखाद्या मतदान अधिकाऱ्याने मतदान यंत्र/व्हिव्हिपॅट मशिन रागाने तोडले तरच मग व्यवस्था जागी होईल का?

❋ आचारसंहिता - मनातील, घरातील, निवडणुकीतील.......काहींची फोटो ऑपॉर्चुनिटी, काहींची ज्ञान पाजळविण्याची : आचारसंहितेची कथा यापेक्षा वेगळी. रविवारचा दिवस होता. नाश्ता थोडा उशिरा झाला. घरातील आवराआवर चालू होती. मुलगा व मुलगी टिव्हीवर टॉम ॲन्ड जेरीची कार्टून सिरीअल पहात होते. पत्नी मुलांना म्हणाली, "ए उठा आता, चला अभ्यासाला बसा, पुढच्या आठवड्यात परीक्षा सुरू होईल. मुलगी हळूच आजीला म्हणाली, ''माझी आचारसंहिता सुरू." मुलगा मला म्हणाला, "बाबा, संध्याकाळी मॉलमधील गेमझोनमध्ये घेवून चला. एकदा का परीक्षा सुरू झाली की, आम्हाला तीन आठवडे परीक्षांच्या आचारसंहिता कालावधीत टिव्ही, गेम्स, मोबाईल खेळता येणार नाही" मी हसलो, पण थोडा गंभीरही झालो. कारण मी लहानपणापासूनच काही घरगुती, शाळांमध्ये, मित्रांमध्ये, वस्तींमध्ये, ऑफीसमध्ये, आचारसंहिता पाहिल्या, अनुभवल्या होत्या. घरामध्ये अमुक एका दिवशी नॉनव्हेज करायचे नाही, खायचे नाही अशी आचारसंहिता. काकांना गवारची भाजी, मावशीला शेपूची भाजी, ताईला भेंडीची भाजी, आजीला तिखट भाजी, आजोबांना कमी मीठ असलेली भाजी खाण्यास द्यायची नाही ही घरातील आचारसंहिता. शाळेत माझ्या मित्रांचे वर्गातल्या एका मुलाशी भांडण झाले, माझा मित्र सोबत असताना त्याच्याशी मी बोलत नसे. परंतु तो एकटा भेटल्यास मी त्याच्याशी बोलत, हसत-खेळत असे. ही बालपणातील आचारसंहिता. महाविद्यालयांत दुसऱ्या ग्रुपने ट्रिप ॲरेंज केली तर जायचे नाही, ही तरूणपणाच्या ताकदीची आचारसंहिता. व्यवस्थेतील आचारसंहिता वेगळी. टेबलवर कितीही कागदपत्रे जोडून दिली, तरी टेबलाखालून काही कागद दिल्याशिवाय प्रकरणे मंजूर होत नाहीत. आता लोकशाही आहे. राजेशाही नाही. पूर्वी राजे-महाराजे जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी दरबार भरवित असे. आता आचारसंहितेच्या कालावधीमध्ये जनतेचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणारे काही महाभाग दिसतात. जे गेल्या काही वर्षांत घडले नाही ते करण्याचा हा प्रयत्न असावा. अशा वेगवेगळ्या आचारसंहिता अनुभवास येत असतात.

आचारसंहिता म्हणजे आचरण करण्याच्या बाबी. थोडक्यात काय करावे, काय करू नये जेणेकरून त्या केलेल्या कृत्यांचा विपरीत परिणाम होईल. व्यक्ती गट, समुह, राजकिय पक्ष, संस्था यांनी सामाजिक स्तरावर आचरण करावयचे काही नियम (प्रमाणके/मानके) असतात. या संकल्पनेत नीती, मानसन्मान व नैतिक, धार्मिक संकेतांचा समावेश असू शकतो.

निवडणूकांमधील आचारसंहिता या थोड्या वेगळ्या प्रकारच्या असतात. याचा लोकशाही टिकविणे हा मूलभूत उद्देश असतो आणि त्याकरिता लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५० मध्ये या आचारसंहिताची नियमावली तयार केली आहे. तिचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरांवर अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले जातात. या लेखात निवडणूकीतील आचारसंहितेची थोडक्यात चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे.

सार्वत्रिक निवडणुका घेणे, त्यासंबंधी तयारी करणे, प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी नियंत्रण करणे असे संचालकाचे महत्त्वपूर्ण कार्य निर्वाचन आयोगाला करावे लागते. सत्तारूढ पक्ष, इतर प्रभावी गट आणि व्यक्ती यांच्याकडून निवडणुकीच्या वेळी वाममार्गाचा वापर होऊ नये यासाठी निर्वाचन आयोगाला दक्ष रहावे लागते. निवडणुका खुल्या व स्वच्छ वातावरणात होण्यासाठी आचारसंहिता तयार करावी लागते. आचारसंहिता राजकीय पक्ष आणि नागरिक निवडणुकीच्या वेळी योग्य असे वर्तन करू शकतात.

मतदान केंद्रांची व्यवस्था करणे, निवडणुकीच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी निरीक्षकांची नियुक्ती करणे, बोगस मतदारांच्या बोटावर न पुसणारी शाई लावण्याची व्यवस्था करणे, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीचे सहीचे सील मतपेटीवर लावणे, मतदान गुप्त पध्दतीने होण्यासाठी मतदान करण्याची योग्य व्यवस्था ठेवणे, मतपत्रिकेची घडी योग्यप्रकारे घालणे इत्यादी कामे निर्वाचन आयोगाला करवून घ्यावी लागतात. आता ही सर्व प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक व्होटींग मशिन करीता राबविली जाते. मुख्य निर्वाचन आयुक्त, उपनिर्वाचन आयुक्ताच्या किंवा निर्वाचन आयोगाच्या सचिवाच्या सहकार्याने निवडणुकांचे संचालन करीत असतो.

निवडणूक संचलनामध्ये आचारसंहितेला खूप महत्त्वाचे स्थान आहे. सार्वत्रिक निवडणुका खुल्या वातावरणात योग्य व चांगल्या पद्धतीने होण्यासाठी निर्वाचन आयोगाने आचारसंहिता तयार केलेली आहे. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष, उमेदवार, शासन, वृत्तपत्रे, दूरदर्शन यांनी कोणत्या पद्धतीने वागावयाचे यासंबधी जे नियम केलेले आहेत. त्यांना आचारसंहिता असे म्हणतात. आचारसंहितेचे पालन न करणाऱ्यांस गंभीर गुन्हा समजून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद केलेली असते. भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये निवडणूक जाहीर झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत

आचारसंहितेचा अंमल राहतो. निवडणुका सुरळीत व शांततेने पार पाडण्यासाठी करायची उपाययोजना, कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत जे नियम केले जातात त्या नियमांच्या संहितेस आचारसंहिता असे संबोधले जाते.

निवडणूक आचारसंहिता प्रथम १९७९ साली तयार करण्यात आली होती. त्यावेळी एस.एल. शकधर हे निर्वाचन आयुक्त होते. त्यावेळी राजकीय पक्ष आणि पुढारी यांनी त्या आचारसंहितेची फारशी दखल घेतली नाही. निर्वाचन आयोगानेसुद्धा निवडणूक आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकारेपणे व्हावी म्हणून कठोर धोरण स्विकारले नव्हते. १९९१ साली निर्वाचन आयुक्त टी.एन.शेषन यांनी पुन्हा नव्याने निवडणूक आचारसंहिता तयार केली. शेषन यांनी आचारसंहितेची अंमलबजावणी कठोर पद्धतीने केली. त्यामुळे आचारसंहितेचा वचक राजकीय पक्ष, नेते, उमेदवार, वृत्तपत्रे यांच्यावर चांगल्याप्रकारे बसला. जे राजकीय पक्ष आचारसंहितेचे पालन करणार नाहीत त्यांची राष्ट्रीय किंवा राज्यपातळीवरील मान्यता काढून घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला प्राप्त झाल्यामुळे राजकीय पक्षांकडून आचारसंहितेचे पालन जबाबदारीने जाणीवपूर्वक झाले. जे उमेदवार आचारसंहितेचा भंग करतील, त्यांच्याविरूध्द निर्वाचन आयोगाने खटले भरले आहेत. आचारसंहितेत उमेदवाराने, त्यांच्या पक्षाने किंवा त्याच्या वतीने प्रचार करणाऱ्या इतर घटकांनी कोणते नियम पाळावयाचे व कोणत्या गोष्टी करावयाच्या नाहीत यासंबंधी निर्वाचन आयोगाने स्पष्ट नियम घालून दिले आहेत. निवडणूक प्रचारात धर्म, भाषा, जात या घटकांचा वापर करता कामा नये. जाहीरसभा, मिरवणुका, भित्तीपत्रके, ध्वज लावणे, ध्वनिक्षेपकांचा व वाहनांचा वापर, सार्वजनिक तसेच खाजगी जागेत कटआउट्स व मोठे फलक लावणे, पोस्टर्स, बॅनर्स छापून घेणे व लावणे, फोटोग्राफी, व्हिडीओ ग्राफी यांचा वापर करणे. शासकीय वाहनांचा वापर न करणे इत्यादीबाबत स्पष्ट नियम केलेले आहेत. या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी जिल्हा प्रशासनाची मदत घेतली जाते. निवडणुकीच्या काळात हत्यारे, दारूगोळा वापरावर व दाऊ विक्रीवर निर्बंध घातले जातात. तसेच शासकीय व निमशासकीय वाहन वापरावर निर्बंध घातले जातात. निवडणूक जाहीर झाल्यापासून निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंत्री, शासकीय अशासकीय अध्यक्ष, संचालक यांची शासकीय वाहने, शासकीय विश्रामगृहे, शासकीय कर्मचारी इत्यादींच्या वापरावर बंदी घालण्यात आलेली असते. मंत्री किंवा प्राधिकारी यांनी मतदारांना कोणत्याही स्वरूपाची वित्तीय अनुदाने किंवा सार्वजनिक कामांची, उपक्रमांची आश्वासने देऊ नयेत. प्रत्येक उमेदवाराने नामनिर्देशन पत्र दाखल केल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत खर्चाचे हिशोब ठेवायचे आहेत. निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार नोंदवहीत रोजच्या रोज खर्च लिहून ठेवणे बंधनकारक असते. मतदानाच्या दिवशी मतदान शांततेने व व्यवस्थित पार पाडण्यासाठी निर्वाचन आयोगाने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन उमेदवारांना करावे लागते. मतदान केंद्रामध्ये तसेच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश करण्याबाबतच्या नियमांचे पालन काटेकोरपणे करणे ही सर्व उमेदवारांची जबाबदारी असते. अशाप्रकारे टी.एन.शेषन यांनी सुरू केलेल्या आचारसंहितेमुळे निवडणुका अधिक स्वच्छ, खुल्या व निकोप वातावरणात होऊ लागलेल्या आहेत.

काही वेळा आचारसंहितेत राजकीय पक्ष व उमेदवार यांच्यावर अवास्तव बंधने लादताना दिसते. उदा. ओपीनियन पोल, एक्झिट पाल वृत्तपत्रांनी किंवा दूरदर्शन व अन्य वाहिन्यांनी प्रसिद्ध करू नये कारण त्यामुळे मतदारांची दिशाभूल होते असे निर्वाचन आयोगाने जाहीर केले होते. एखाद्या संस्थेने किंवा वृत्तपत्राने अंदाज केल्यामुळे मतदार आपली मते बदलतात या आयोगाचा हा निर्बंध अयोग्य वाटतो. निवडणुकीच्या काळात आचारसंहितेद्वारा राजकीय पक्ष व उमेदवार यांच्यावर अवास्तव, अवाजवी निर्बंध लादणे हे अयोग्य व लोकशाहीशी विसंगत ठरेल. तरीपण राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी निवडणूक काळात भ्रष्टाचार, दादागिरी, दहशतवाद आणि लबाडी करू नये म्हणून आचारसंहिता ही आवश्यक व अपरिहार्य ठरते.

### निवडणूक आयोगाने आखून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे –

१. चालू असलेले विकास कार्यक्रम पुढे सुरू ठेवता येतील.
२. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःष्पक्षपातीपणे उलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना (निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडचा वापर निःष्पक्षपातीपणे उपलब्ध करून दिला पाहिजे.)
३. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.
४. इतर पक्षांनी आयोति केलेल्या सभा व मिरवणुकीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण करण्यात येऊ नयेत.

५. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि अशी परवानगी मिळविण्यात यावी.
६. प्रस्तावित सभेची ध्वनिवर्धक किंवा कोणत्याही अशा सवलतीचा वापर करण्यासाठी परवानगी मिळवली पाहिजे.
७. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तीबरोबर व्यवहार करण्यासाठी पोलिसांमार्फत प्रतिबंध करण्यात यावा.
८. मोर्चामुळे वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.
९. ज्यांचा शस्त्रे किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल, अशा कोणत्याही वस्तू मोर्चात सहभागी असलेल्या व्यक्तींनी जवळ बाळगू नये.
१०. निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी बिल्ले व ओळखपत्रे ठळकपणे लावली पाहिजेत.
११. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्या या साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवारांचे किंवा पक्ष यांचा निर्देश असणार नाही.
१२. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधाचे पूर्णपणे पालन करण्यात येईल.
१३. निवडणूक आयोगाने वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तींना मतदान/मतमोजणी केंद्रात जाता येणार नाही.
१४. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकार/क्षेत्र/प्रभाग दंडाधिकार यांच्या किंवा निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

### राजकीय पक्ष व उमेदवारांनी काय करू नये यासंबंधीची निवडणूक आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे :

१. शासकीय वाहने, कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करू नयेत.
२. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये.
३. कोणत्याही वित्तीय अनुदानांची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इत्यादी बांधण्याचे वचन देणे इ. गोष्टी करू नयेत.
४. कोणतेही मंत्री, तो उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येणार नाही.
५. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.
६. मतदाराच्या जातीय भावनांना आवाहन करण्यात येऊ नये व परस्परांतील वैमनस्य वाढेल अशी कोणतीही कृती करू नये.
७. ज्यांचा खरे खोटेपणा पडताळून पाहिलेला नाही, असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरूप देऊन इतर पक्ष किंवा कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.
८. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत, इ. यासाठी मंदिरे/देवळे, मशिदी, चर्च, गुरूद्वार किंवा कोणत्याही प्रार्थना स्थळांचा वापर करू नये.
९. लाच घेणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, शोट्या नावाने मतदान करणे, मतदान कक्षापासून २०० मीटरच्या आत निवडणूक प्रचार करणे, मतदानाची वेळ समाप्त होण्याच्या वेळेबरोबर संपणाऱ्या ४८ तासांच्या कालावधीत सार्वजनिक सभा घेणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचवणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहे.
१०. व्यक्तीची मते किंवा कृत्ये याविरूध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे धरण्यात येऊ नयेत.
११. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या विपरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षानिकट प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.
१२. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारे मद्याचे वाटप करण्यात येऊ नये.

अशा प्रकारे निवडणूक आयोग आचारसंहिता लागू करून निवडणूक निःपक्षपातीपणे राबविण्याचा प्रयत्न करते. या आचारसंहितेचे आपण योग्यप्रकारे आचरण केल्यास आपली लोकशाही अबाधित राहील असे वाटते.

परंतु हे एवढ्यावर थांबत नाही. वेगवेगळे तज्ञ, महाभाग, ज्ञानी मंडळीदेखील यांच वेगळेपण दाखविण्यात भूषण मानतात. एका राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाने एका वर्तमानपत्रात सूट-टाय (भर उन्हाळ्यातील ४० अंश तापमानाला) घालून फोटो दिला व बातमी दिली, कर्मचाऱ्यांना एक दिवस सुट्टी देण्याची कारण निवडणूकीच्या कामाचा शारिरीक व मानसिक ताणातून मुक्तता मिळण्यासाठी. या राज्यशास्त्र विषयाच्या प्राध्यापकाकडून अपेक्षा की त्यांनी निवडणूक, मतदान कार्यपध्दतीमध्ये सुधारणा, प्रक्रिया सुचविल्यास निवडणूक आयोग, कर्मचारी यांना यांचे काम सुसह्य (ताणमुक्त) झाले असते. परंतु तसे झाले नाही. दुसऱ्या एका अर्थतज्ञाने निवडणूकीचा आर्थिक बोजा सरकारच्या तिजोरीवर किती पडणार? याची चिंता व्यक्त केली. या अर्थतज्ञ महाशयांना सध्याच्या दुष्काळाचा, पाणी टंचाईचा, बेरोजगारीच्या प्रश्नांचा आर्थिक भार शासकिय तिजोरीवर किती पडेल? यावर भाष्य केल नाही. भारतातील ५४३ मतदार संघात निवडणूकीच काम करणाऱ्या प्रतिनियुक्तीवरील ४६ लाख ५० हजार कर्मचाऱ्यांनी बचत केलेल्या ९५० कोटी रूपयांबद्दल कोठेही उल्लेख नाही. कदाचित सरकार या तज्ञाला वेतन, पगार, स्कॉलरशिप देत असावं, म्हणून त्यांनी सरकारची बाजू मांडली. सगळ्यात मोठी गंमत एका नामांकित विद्यापीठाच्या कुलगुरूंची. निवडणूक अधिकाऱ्यांनी नवमतदार विद्यार्थ्यांमध्ये मतदान जागृती करताना कुलगुरू महाशयांनी निवडणूक अधिकारी, विद्यार्थ्यांसोबत फोटो कि सेल्फी काढून दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात फोटोसहीत हजेरी दर्शविली. त्यांनी जाहीर केले, ''आमचे विद्यापीठ मतदानाच्या दिवशी परीक्षा घेणार नाही'' यात नविन काय? कारण १९५७ च्या निवडणूक सुधारणा समितीने, जगन्नाथराव समिती १९७१-७२ यांनी ''मतदानाच्या दिवशी महाविद्यालये, विद्यापीठे, स्पर्धा परीक्षा घेवू नयेत अशा सुचना केल्या आहेत. कारण विद्यार्थ्यांना मतदान करता यावे व शासकिय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांचे वर्ग, ग्रामपंचायत, महानगरपालिका इत्यादी सरकारी इमारतींचा वापर मतदान केंद्र म्हणून करता यावा हा दृष्टीकोन. परंतु या कुलगुरूंना फोटो ऑपॉर्चुनिटीची हौस भारी. याच कुलगुरूंच्या विद्यापीठातील एका अधिकाऱ्याने निवडणूक कामात अडथळा आणल्या प्रकरणी तक्रारीस कुलगुरूंनी मौनव्रत (कदाचित आचारसंहितेचा एक भाग) घेतले. अशा विद्यापीठात निवडणूक प्रशासन विषयावर झालेल्या संशोधनाचा उपयोग नसल्याचे म्हणणारे झारीतले शुक्राचार्य वेगळेच. परंतु अशा संशोधनास आम्ही प्रोत्साहन देतो असे शासनास कळवून २-३ कोटी रूपये अनुदान मिळविणारे वेगळेच. २०१७ मध्ये निवडणूक प्रणालीवर भाष्य करणारा 'न्यूटन' चित्रपट येऊन गेला. 'सिक्रेट बॅलेट' हा बबक पयामी यांच्या इराणी चित्रपटाशी मिळती-जुळती कृती या चित्रपटातील नायकाने केली आहे. या चित्रपटाचे ९ कोटी रूपयांचे बजेट होते. या भारतीय चित्रपटाने रूपये ३१.२५ कोटींचा बॉक्स ऑफीसवर व्यवसाय केला. नंतर हा चित्रपट ऑस्करसाठी गेला. या चित्रपटातील काही दृष्ये पुढीलप्रमाणे - मतदानाच्या दिवशी पहाटे ४ वाजता निवडणूक कर्मचारी अंडी, ब्रेड-बटर, केळी, चहा खाताना दाखविले आहे, मतदान केंद्राला दारे-खिडक्या नाहीत, मतदान केंद्रात मतदान चालू असताना कर्मचारी पत्ते खेळताना दाखविले आहे, सुरक्षा अधिकारी झोपलेला दाखविला, मतदान चालू असताना महिला कर्मचारी झाडाखाली बसून जेवताना दाखविली, मतदान केंद्रातील आतील व बाहेरील भिंतींवर लिखाण, चित्रे दाखविली आहेत, सुरक्षा अधिकारी मतदान अधिकाऱ्यास दमदाटी करताना दाखविला आहे आणि बऱ्याच विरोधाभास दर्शविणारे प्रसंग दाखविले आहेत. या चित्रपटाबद्दल राज्यशास्त्र, अर्थशास्त्रातील प्राध्यापकाने किंवा व्यवस्थेतील इतर घटकांनी प्रतिक्रिया किंवा भाष्य केले नाही.

निवडणूक आयोग, शासन, प्रतिनियुक्तीवरील निवडणूक कर्मचारी यांची देशाची लोकशाही जतन करण्यासाठी दमछाक होत असते. निवडणूक हे राजकारण्यांचे युध्दक्षेत्र असते. पण याचा वापर करून घेणारे व्यवस्थेतील महाभाग म्हणजे कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे, फोटो ऑपॉर्चुनिटी, ज्ञान पाजळविण्याच क्षेत्र समजतात, असे चित्र दिवसेंदिवस बदलताना दिसते. या आचारसंहितेचा अर्थ किंवा आदर्श व्यवस्थेतील इतर घटकांनी घेतल्यास खऱ्या अर्थाने लोकशाहीचा जागर होईल आणि आचारसंहितेचे नियम करण्याची / बदलण्याची गरजच भासणार नाही असे वाटते.

हे सर्व काही घडल्यास किंवा घडले असल्यास भविष्यात असे निवडणूक कर्मचाऱ्यांची अवहेलना होवू नये म्हणून व्यवस्थेने वेळीच दखल घ्यावी. असे वाटते.

**संदर्भ :–**


१) निवडणूक कामावर जाताना कोल्हापूरात अपघातात तलाठी ठार, दै. लोकमत दि. २३ एप्रिल २०१९, पृष्ठ ६.
२) निवडणूक प्रशिक्षणाच्या वेळी मिरजेत शिक्षकाचा मृत्यु : हृदयविकाराचा झटका : आणखी दोघे रूग्णालयात, दै. सकाळ दि. १३ एप्रिल २००९ पृष्ठ २.
३) निवडणूक सहजतेने घेऊ नका, दै. लोकमत दि. २० एप्रिल २०१९, पृष्ठ ५
४) सरकारने निवडणुकीच्या तोंडावर सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जुंपले कामाला, दै. लोकमत दि. १६ जानेवारी २०१९ पृष्ठ ४.
५) जिल्हा निवडणूक अधिकारी, नाशिक यांचे पत्र क्र. निवडणूक/कावि/संकलन क्र. १/७८५/२०१९ दि. २३/०४/२०१९.
६) भारत निर्वाचन आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र ४६४/आयएनएसटी/२०१९/ ईपीएस दि. १७ एप्रिल २०१९.
७) मतदानयंत्रे खरेदीसाठी लागतील ४५०० कोटी, दै.सकाळ दि. ४ सप्टें. २०१८ पृष्ठ १.
८) जि.प. निवडणुकीत राज्याकडून अडथळे : निवडणूक आयोगाची याचिका, दै. सकाळ दि. २८ ऑगस्ट २०१८ पृष्ठ ४.
९) निवडणूक आयोगाची पालिकेला नोटीस, दै. लोकमत हॅलो, पुणे, दि. ४ डिसेंबर २०१६ पृष्ठ १.
१०) संशोधनानेच देश अधिक समृध्द होणार, दै. सकाळ पुणे शहर, दि. २ ऑक्टो. २०१७.
११) विद्यार्थिनीच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल, दै. लोकमत हॅलो पुणे दि. २४ मे २०१८ पृष्ठ १.
१२) अमेरिकेत जाणे विद्यार्थ्यांना झाले सोपे, दै. लोकमत दि. ८ जाने. २०१५ पृष्ठ १ (हॅलो पुणे).
१३) निवडणूक कर्मचाऱ्यांची खानपान सुविधा रामभरोसे, दै. लोकमत, हॅलो पुणे दि. १३ फेब्रु. २०१७ पृष्ठ १.
१४) मतदार साडेसव्वीस लाख, निवडणूक खर्च २२ कोटी : दै. लोकमत दि. १३ जाने. २०१७ पृष्ठ १.
१५) सरकारी मतदान यंत्रात १७ प्रकारची सुरक्षा यंत्रणा, दै. लोकमत दि. २४ जून २०१८ पृष्ठ ४.
१६) निवडणूक कर्मचारी : शासकीय व्यवस्थेतील दुर्लक्षित घटक, दै. प्रभात (रूपगंध) दि. १४ मे २०१७, पृष्ठ क्र. ४
१७) मन की बात निवडणूक कर्मचाऱ्यांच्या : साप्ताहिक चपराक दि. ०१ एप्रिल ते ७ एप्रिल २०१९ पृष्ठ ७.
१८) आयुक्तांच्या कालावधीचे गौडबंगाल : दै. प्रभात (रूपगंध) दि. ९ डिसेंबर २०१८.
१९) सर्व निवडणूक आयुक्तांना संरक्षण हवे : दै. सकाळ दि. २२/१२/२.१८.
२०) www.news18com>india, Policeman Killed, 15 injured in two, Anatnag Accedents - News 18.
२१) Madhya Pradesh Polls : Three election officers die of cardiac arrest : m.economictimes.com : Nov. 28, 2018.
२२) अंगणवाडी सेविकांना इलेक्शन ड्युटी 'ऐच्छिक' : दै. प्रभात दि. २५ एप्रिल २०१९.
२३) संशोधन प्रकल्पांसाठी करार : दै. महाराष्ट्र टाईम्स दि. २५/०४/२०१९ पृष्ठ२.
२४) मा. कुलगुरूंना कर्मचाऱ्याने अर्जाव्दारे दि. ०८/०४/२०१९ रोजी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत मागितलेली भेटीची वेळ.
२५) 'न्यूटन' चित्रपट आणि प्रशासकीय वास्तव : दै. प्रभात (रूपगंध) दि. ८ ऑक्टो. २०१७ पृष्ठ ९.
२६) निवडणूक आयोगाची स्वायत्तता : प्रा. गोळविलकर स.म. दै. सकाळ दि. २७ मे २००६ पृष्ठ ४.
२७) ॲट्रॉसिटी एफ.आय.आर.०७/२०१५ चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन, पुणे (महाराष्ट्र).
२८) मुंबई उच्च न्यायालय याचिका क्र. ७६०४/२०१६ (दिवाणी).
२९) मुंबई उच्च न्यायालय याचिका क्र. १६८१/२०१६ (फौजदारी).


LBP PUBLICATION